**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५८/२०२४ मधील निशाणी ०५ वरील आदेश</u>**

०१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसेपासून स्त्रीयांचे संरक्षण कायदा २००५ कलम २३ प्रमाणे गैरअर्जदार कडून रक्कम रु.१०,०००/– इतका अंतरिम निर्वाह भत्ता मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत मिळणेसाठी केला आहे.

०२. मुळ अर्ज कौटुंबिक हिंसेपासून स्त्रीयांचे संरक्षण कायदा २००५ कलम १२ अन्वये दि.१६/११/२०२४ रोजी दाखल झालेला आहे.

०३. अर्जदार हिने मुळ अर्जामध्ये असे कथन केले आहे की, तिचा आणि गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दि.११/०५/२०२३ रोजी झाला असून त्यामुळे त्यांचे दरम्यान कौटुंबिक संबंध निर्माण झालेले आहेत. अर्जदारने मुळ अर्जामध्ये तिचेशी गैरअर्जदार यांनी विवाहाचे एक महिन्यानंतर केलेल्या कौटुंबिक हिंसेचे सविस्तर कथन केलेले आहे. तिने असे कथन केले की, विवाहामध्ये आई वडिलांनी मानपान केला नाही, हुंडा कमी दिला म्हणून गैरअर्जदार यांनी तिला शारीरीक व मानसिक त्रास दिला, मारहान केली व घरातून हाकलून दिले. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ कडे शारीरीक संबंधाची मागणी केली तर गैरअर्जदार तिला मारहाण करीत होता व तिच्याशी शारीरीक संबंध ठेवत नव्हता. विवाहानंतर गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराला कधीही, कसल्याही प्रकारचे शारीरीक सुख दिले नाही. दि.२३/०३/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारास लाथा बुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर गैरअर्जदारांनी

अर्जदारास नांदविण्यास नकार दिला. त्यामुळे अर्जदार तिच्या आई वडिलांकडे राहत आहे.

०४. गैरअर्जदार क्र.१ हा सहाय्यक रेल्वे चालक म्हणून नोकरीस आहे. तो दरमहा रक्कम रु.५५,०००/– कमवित आहे. तसेच जाबदेणार यांची शेती असून त्यामधुन वार्षिक ५ लाख रुपये उत्पन्न मिळते. जाबदेणार यांचे घर आहे. जाबदेणार क्र.१ कडे १० लाख रुपये बँक बॅलन्स आहे. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराला निर्वाह भत्ता देण्यास सक्षम आहे. उलट, अर्जदार हीचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. मुळ अर्जाचा निर्णय होण्यास काही कालावधी लागणार आहे. अंतत: अर्जदारने प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०५. गैरअर्जदार यांनी निशाणी ११ कडे म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास विरोध केला. गैरअर्जदार यांनी असे कथन केले की, अर्जदाराने विवाहानंतर गैरअर्जदार क्र.१ बरोबर कधीही व्यवस्थीत संसार केला नाही व पत्नीचे सुख दिले नाही. अर्जदार केवळ १५ ते २० दिवस व्यवस्थीत नांदली. त्यानंतर तिला खेड्यात रहाणे आवडत नाही, पुण्यामध्ये क्लासला जाण्याची परवानगी द्या असे म्हणू लागली. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ वर संशय घेत होती. अर्जदार गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचा सांभाळ करीत नव्हती व कोणतेही काम करीत नव्हती. अर्जदार गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना शिवीगाळ करायची. अर्जदार गैरअर्जदार क्र.१ याच्यासोबत शारीरीक संबंध ठेवण्यास टाळाटाळ करीत होती. तसेच, मुलबाळ नको असे म्हणत होती. अर्जदाराने

गैरअर्जदार क्र.१ यास तुमचे बाहेर अनैतिक संबंध आहे असे म्हणून १० लाख रुपयांची मागणी केली. पैसे नाही दिले तर खोट्या केसेसमध्ये अडकवणार अशी धमकी दिली. अर्जदाराने स्वतःहून गैरअर्जदार क्र.१ चा त्याग केला आहे. गैरअर्जदाराने अर्जदारास नांदविण्याचा प्रयत्न केला. मात्र अर्जदाराने नांदण्यास नकार दिला. गैरअर्जदारावर त्याच्या आई वडिलांची जबाबदारी आहे. अर्जदार स्वतः उच्च शिक्षीत आहे. अर्जदारने पुर्वी नोकरी केलेली आहे. सन २०२४ मध्ये अर्जदार वाघोली येथे नोकरीस होती. अर्जदाराने केवळ गैरअर्जदारांना त्रास देण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने कर्जत येथील न्यायालयातदेखील अंतरीम पोटगीचा अर्ज दाखल केला आहे. सदर बाब अर्जदारने जाणिवपुर्वक लपविली आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराला कधीही शारीरीक व मानसिक त्रास दिलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारास नांदविण्यास तयार आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी अशी विनंती केली की, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०६. अर्जदार व जाबदेणार यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. पुढील मुद्दे माझे विचारार्थ निश्चित होत असून त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अर्जदार हे प्रस्तुत अर्जानुसार अंतरिम निर्वाहभत्ता मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...अंशतः होय. |
| २. आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमीमांसा**

०७. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह झाल्याची बाब उभय पक्षकारांमध्ये निर्विवाद आहे.

**मुद्दा क्रमांक १ बाबत–**

०८. अर्जदारच्या कथनानुसार तिला होणाऱ्या कौटुंबिक त्रासामुळे ती सध्या तिच्या माहेरी रहात आहे. अर्जदार हिचेबाबत कौटुंबिक हिंसा घडली आहे अथवा कसे हे मुळ अर्जाची चौकशी होवून गुणदोषांवर सिध्द होणार आहे. सद्यस्थितीत मूळ अर्ज व प्रस्तूत अर्जातील कथनांवरुन प्रथम दर्शनी असे दिसून येते की, अर्जदार हिचेबाबत कौटूंबिक हिंसाचार झालेला आहे. गैरअर्जदाराच्या कथनानुसार तो अर्जदारास नांदविण्यास तयार आहे. मात्र एकंदरीत परीस्थीतीवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदारापासून होणाऱ्या कौटूंबिक हिंसाचारामुळे अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास सद्य स्थितीत गेलेली नाही.

०९. अर्जदार हिचे कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ हा नोकरीतून दरमहा ५५ हजार रुपये उत्पन्न मिळवितो. गैरअर्जदार यांनी गैरअर्जदार क्र.१ हा नोकरी करीत असल्याची बाब नाकारलेली नाही. गैरअर्जदार यांनी मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात नोकरीतून दरमहा २५,५०० रुपये उत्पन्न मिळत असल्याचे नमूद केले आहे. गैरअर्जदार क्र.१ ने त्याच्या पगार पत्रकाची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्यावर त्याचे मुळ वेतन २५,५००/– रुपये असल्याचे नमूद आहे व सखल वेतन ६९,८७१/– रुपये असल्याचे नमूद आहे.

१०. अर्जदारचे कथनानुसार गैरअर्जदार हे शेतीतून उत्पन्न मिळवितात. मात्र त्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. तसेच, अर्जदारचे कथनानुसार, गैरअर्जदार क्र.१ कडे १० लाख रुपये बँक बॅलन्स आहे. त्याबाबतदेखील कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही.

११. गैरअर्जदार तर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, गैरअर्जदार हे स्वच्छ हाताने व प्रामाणिकपणे न्यायालयासमोर आलेले आहेत. मात्र अर्जदारने प्रस्तूत व मुळ अर्जामध्ये महत्वाच्या बाबी लपवून ठेवल्या आहेत. अर्जदारने तिच्या उत्पन्नाबाबत माहिती लपविली आहे. तिच्या बँक खाते उताऱ्यांची आवश्यक प्रत सादर केलेली नाही. अर्जदार ही स्वच्छ हाताने व प्रामाणिकपणे न्यायायलासमोर आलेली नाही. त्यामुळे अर्जदार निर्वाहभत्ता मिळण्यास पात्र नाही.

१२. सदर युक्तीवादाच्या समर्थनार्थ, गैरअर्जदार यांनी अर्जदाराचे नोकरीस असल्याबाबत ओळखपत्र, अर्जदाराचे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा इंदापूर येथील दि.०१/११/२०२२ ते दि.३०/०४/२०२३ पर्यंतचे खाते उतारे, अर्जदाराचे हेल्थ कार्ड व अर्जदारने कर्जत येथील न्यायालयात एच एम पी क्र.१४८/२०२४ मध्ये दाखल केलेला अंतरिम पोटगीचा अर्ज इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

१३. सदर दाखल कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार ही ए.डी.सी ट्रेनींग्स कंपनी, पुणे येथे नोकरीस होती. तिच्या बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा इंदापूर येथील खात्यावर दरमहा १० ते १५ हजारांच्या रकमा जमा झाल्या आहेत. सदर कागदपत्रे ही अर्जदार उच्च शिक्षीत असून नोकरी करण्यास सक्षम आहे या गैरअर्जदारांच्या कथनास प्रथमदर्शनी दुजोरा देतात.

१४. तसेच, गैरअर्जदारतर्फे दाखल कागदपत्रांवरुन अर्जदाराने कर्जत येथील न्यायालयात देखील निर्वाहभत्ता मिळण्याकरीता अंतरिम अर्ज दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर बाब अर्जदाराने मुळ अर्जात अथवा प्रस्तुत अर्जात नमूद केलेली नाही.

१५. अर्जदाराने तिच्या मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे नमुद केले आहे. तसेच, अर्जदाराने तिच्या तीन वर्षांच्या बँक खाते उताऱ्याची प्रत दाखल केलेली नाही.

१६. असे असले तरी, गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदार ही उत्पन्न मिळविण्यास सक्षम असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. मात्र, अर्जदार सद्यस्थितीत उत्पन्न मिळवित असल्याची बाब स्पष्ट झालेली नाही. अर्जदारास इतर कोणत्याही आदेशानुसार, निर्वाहभत्ता मिळत असल्याची बाबदेखील समोर आलेली नाही. सद्यस्थितीत, अर्जातील कथनांवरुन, अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे.

१७. अशापरिस्थीतीत, अर्जदार ही तिच्या आई वडीलांवर उदरनिर्वाहासाठी अवलंबुन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे विवाहानंतर पत्नीचा योग्यप्रकारे सांभाळ करण्याची गैरअर्जदार क्र.१ ची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ पासून विभक्त रहात असल्यापासून गैरअर्जदाराने अर्जदाराच्या सांभाळाची, उदरनिर्वाहाची तजवीज केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. परिणामी, अर्जदार ही मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत निर्वाह भत्ता मिळण्यासाठी पात्र आहे असे मी समजतो.

१८. अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी गैरअर्जदारची आहे. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांची परिस्थिती, त्यांचे राहणीमान, सध्याची महागाई तसेच अर्जदार ही उत्पन्न मिळविण्यास सक्षम आहे या बाबी लक्षात घेता गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार हिस दरमहा २,०००/- रुपये निर्वाह भत्ता देण्याबाबत आदेश करणे योग्य व न्यायसंगत होईल असे मी समजतो. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर अंशतः होय

असे नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक २ बाबत–**

१९. मुद्दा क्रमांक १ च्या निष्कर्षानुसार अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश.

आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

०२. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारास दरमहा र.रु.२,०००/– (रक्कम रुपये दोन हजार फक्त) इतकी रक्कम अंतरीम निर्वाह भत्ता म्हणून मुळ अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाच्या अंतिम निर्णयापर्यंत द्यावी.

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2025.10.08 16:50:05 +0530

इंदापूर (प्र.चं.बारटक्के)

दिनांकः ०८/१०/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.